# University of Mumbai

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/२०० /२०१९

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक आपणा सर्वांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ १९८ /२०१९, दि. १९ नोव्हेंबर, २०१९ अन्वये द्वितीय सत्र २०१९ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या काही अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत असे कळविण्यात आले होते.

तरी, वरील परिपत्रकात नमुद असलेल्या अभ्यासक्रमाच्या परीक्षांसोबतच द्वितीय सत्र २०१९ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या खालील अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत:-

1) T.Y.B.Sc. (Biotechnology) (Sem-V & VI) (Choice Based)
2) T.Y.B.Sc. (Computer Science) (Sem-V & VI) (Choice Based)

**Path for Online Application:-**
www.mu.ac.in → Exams & Results → Examination → Application for Revaluation / Photocopy
Read the instructions carefully and proceed for filling the form.

उपरोक्त लिंक संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर पुढील सात दिवसाच्या आत सुरू करण्यात येईल व लिंक सुरू झाल्यापासून पुढील बारा दिवसांपर्यंत ही लिंक सुरू राहिल, तरी या कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

वरील अभ्यासक्रमांमध्ये T.Y.B.Sc. (Biotechnology) (Sem-V & VI) (Choice Based) या मधील ज्या विषयांची (Applied Components) परीक्षा विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांनी घेतलेली आहे या विषयांसाठीचे पुनर्मुल्यांकनाकरिताचे अर्ज संबंधित परीक्षांचे निकाल जाहिर झाल्यापासून पुढील २० दिवसांच्या आत सॉफ्ट कॉपी (सी.डी) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपुर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती. तसेच या विषयांच्या छायांकित प्रती महाविद्यालयाने आपल्या पातळीवर मागणीप्रमाणे पुरवाव्यात.

विद्यापीठाकडे पुनर्मुल्यांनासाठी वरील प्रमाणे अर्ज पाठविताना अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.



Scanned by CamScanner

# University of Mumbai

अर्ज स्वीकारण्याची वरील मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

वरील प्रमाणे विद्यापीठाच्यावतीने महाविद्यालयांनी घेतलेल्या T.Y.B.Sc. (Biotechnology) (Sem-V & VI) (Choice Based) या अभ्यासक्रमाच्या Applied Components विषयांचे पुनर्मूल्यांकन महाविद्यालय स्तरावर करून पुनर्मूल्यांकनात प्राप्त गुणांची यादी सॉफ्ट कॉपी (सी.डी) व हार्ड कॉपी स्वरूपात संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यापासून ३५ दिवसांच्या आत पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.

वरील प्रमाणेचे अर्ज व गुणांच्या यादया नमुद केलेल्या कालावधी नंतर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही व याबाबत भविष्यात काहि प्रशासकीय/तांत्रिक /न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास यांस संबंधित महाविद्यालय जबाबदार राहिल.

उपरोक्त प्रकियेसाठी शुल्काचा तपशील:-

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुर्नमुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०१९

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे सं चालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. केंद्रीय संगणक सुविधा विभागातील सर्व अधिकारी वर्ग
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्विय सहायक



Scanned by CamScanner